

किशोर बोर्डे
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

## सुधारित अर्थसंकल्प सन २०१२-१३ सह सन २०१३-२०१४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत मा.आयुक्त यांचे मनोगत

आदरणीय सभापती, सन्मा. सदस्य, अधिकारी आणि पत्रकार बंधू-भगिनी,

सन्मा. प्रथम महापौर, मा. महापौर, मा. उप-महापौर, मा. सभागृहनेते, मा. गटनेते, मा. विरोधी पक्षनेते, सर्व. सन्मा. सदस्य, मिडीया प्रतिनिधी, पत्रकार, लोकप्रतिनीधी, सर्व. सन्मा. नागरीक व अधिकारी वर्गाने मला दिलेल्या सहकार्या बद्दल प्रथमतः धन्यवाद !

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९५ नुसार सन २०१२-१३ च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पासाठीचे उत्पन्न खर्चाचे अंदाज सादर करताना अत्यंत आनंद होत आहे. संस्थेच्या प्रगतीसाठी आपण सर्वांनी तळमळीने केलेल्या प्रयत्नांच्या फलस्वरुप १) पाणीपुरवठा योजना २) गोखिवरे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प ३) यशस्वी शहर परिवहन सेवा ४) स्थानिक संस्था कराची यशस्वी सुरुवात या ठळक बाबींसह अनेक विशेष अशी विकासकामे व नियमीत कामे तसेच विविध योजना या बाबींचा विचार करता मुंबई महानगरपालिकेनंतर द्वितीय क्रमांकाचे विस्तीर्ण क्षेत्र असलेल्या महानगरपालिकेचा सर्वांगीण विकास करणेच्या दृष्टीने योग्य वाटचाल सुरु आहे असे वाटते.

महानगरपालिकेच्या ५ व्या व लोकप्रतिनिधींचा थेट सहभाग असलेल्या ३ ऱ्या अर्थसंकल्पात मा. महासभेच्या धोरणात्मक निर्णयानुसार सद्य स्थितीतील करदात्यांवर

कोणताही वाढीव कर अथवा कराचे वाढीव दर न आकारता अधिक - अधिक शासकिय अनुदाने, विशेष योजना व उपलब्ध उत्पन्न साधनांचा व उत्पन्नाचा सुयोग्य लाभ घेऊन समाजातील सर्व घटकांना न्याय देऊन सुनियोजीत, सुसंस्कृत हरित वसईच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक तरतुदी आहेत.

महानगरपालिकेचा सन २०१२-१३ चा सुधारीत अर्थसंकल्प ₹ १३८६ कोटी २१ लक्ष असुन सन २०१३-१४ चा अर्थसंकल्प ₹ १६७८ कोटी ६८ लक्ष इतका आहे. सन २०१२-१३ चा खर्च ₹ ९३५ कोटी ६१ लक्ष इतका असुन सन २०१३-१४ चा अपेक्षित खर्च ₹ १६६५ कोटी ८४ लक्ष इतका आहे. सन २०१२-१३ अखेर ₹ ४५० कोटी ६० लक्ष शिल्लक अपेक्षित असून सन २०१३-१४ अखेर ₹ १२ कोटी ८४ लक्ष शिल्लक अपेक्षित आहे.

## ❖ ठळक उत्पन्न बाबी ❖

१) सॅटेलाईट सिटीसाठी संपूर्ण भारतातून निवडल्या गेलेल्या आठ शहरांपैकी वसई विरार शहर महानगरपालिका हि महाराष्ट्रातील एकमेव महानगरपालिका ठरली असून या योजने अंतर्गत याव्दारे ₹ ५५७ कोटी इतका निधी उपलब्ध होणार आहे. सन २०११-१२ ते नोव्हेंबर २०१२ अखेर प्रत्यक्ष ₹ २२ कोटी ०४ लक्ष निधी प्राप्त झाला आहे.

२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनअंतर्गत ₹ १५० कोटी व एकात्मीक तलाव संवर्धन योजनेमध्ये ₹ १७ कोटी ५० लक्ष इतके अनुदान अपेक्षित आहे. कत्तलखाना प्रकल्पासाठी ₹ १०० कोटी अनुदान अपेक्षित असून ₹ २ कोटीची प्राथमिक तरतुद करण्यात आली आहे. सन २०१२-१३ व सन २०१३-१४ *मधे अनुक्रमे ₹ १२४ कोटी ०६ लक्ष ६४ हजार व ₹ ३७४ कोटी ०५ लक्ष ९१ हजार इतकी एकूण अनुदाने अपेक्षित आहेत.*

३) मोकळ्या बिनशेती जमिनी व मोबाईल टॉवर्स असणाऱ्या मालमत्तांचे भाडेमुल्य योग्य पद्धतीने निश्चित करुन कर आकारणी, अस्तित्वातील कर आकारणी न झालेल्या मालमत्तांचा शोध घेऊन १००% मालमत्तांवर कर आकारणी, तसेच नव्याने विकसित होणाऱ्या मालमत्तांची वेळीच कर आकारणी पुर्ण करणेचा संकल्प आहे. याद्वारे ₹ ८४ कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.

४) भुतपूर्व नगरपरिषद क्षेत्रासाठी प्राप्त झालेले जकात कराचे उत्पन्न, होणारी नैसर्गिक वार्षिक वाढ, व्यापारी व उद्योजकांचे सहकार्य, विस्तारीत क्षेत्र व स्थानिक संस्था कराची आकारणी

महानगरपालिका क्षेत्राबाहेर देखिल त्या त्या संस्थाकरिता केली जाणार असल्याची तरतूद, महानगरपालिकेने कर भरण्यासाठी उपलब्ध केलेल्या सुविधा व लवचिक कार्यपध्दती, प्रोत्साहनपर सोयी सुविधा व सवलती आणि कराचे महाराष्ट्रातील सर्वात न्युनतम दर असे पोषक वातावरण, लेखे पडताळणी करुन ७ वर्षापर्यंत सव्याज कर वसुल करता येण्याची तरतुद याबाबी विचारात घेता जकात करा इतकेच उत्पन्न स्थानिक संस्था करापासुन देखिल अपेक्षित धरले आहे. स्थानिक संस्था कराव्दारे सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ २६० कोटी व ₹ ३१२ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

५) महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारांमुळे भविष्यातील वाढीव लोकसंख्येस पुरवावयाच्या सुविधांचा आर्थिक भार नव्याने विकसीत होणाऱ्या बांधकामांच्या विकासकाकडून परस्पर वसुल केला जात असून परिणाम स्वरुप सद्याच्या करदात्यांवर कोणताही आर्थिक बोजा न पडता वार्षिक सरासरी ₹. २०० कोटी उत्पन्नाचा कायम स्वरुपी स्त्रोत उपलब्ध झाल्याने विकासास गती प्राप्त झाली आहे. भविष्यकालीन सुविधा देण्याची विकासकांची जबाबदारी, विकासाचा दर, याबाबी विचारात घेता फायर कॅपिटेशन फी, नविन पाणी पुरवठा स्त्रोत विकास शुल्क, अनधिकृत बांधकाम नियंत्रण शुल्क याद्वारे भरीव उत्पन्न अपेक्षित आहे. छाननी शुल्क, विकास शुल्क, प्रिमियम, टिडीआर प्रिमियम, पुनर्वैधिकरण इत्यादी नगररचना विषयक बाबींपासुन सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधे एकत्रितपणे अनुक्रमे ₹ १५२ कोटी ६७ लक्ष व ₹ १७२ कोटी ९० लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

६) शहराच्या सौदर्यीकरणास बाधा येणार नाही अशी मोक्याची ठिकाणे निश्चित करुन सदर ठिकाणी, ठिकाणानुसार वेगवेगळ्या दराने जागा भाडे निश्चित करुन लिलाव पध्दतीने जाहिरातीस परवानगी देण्याचा प्रस्ताव आहे. याव्दारे कायम स्वरुपी उत्पन्न स्त्रोत निर्माण होणार आहे. महानगरपालिका क्षेत्रात सर्व विभागात समान दराने जाहिरात कर आकारणी केली जाईल. याद्वारे ₹ ५ कोटी उत्पन्न अपेक्षित धरले असून ते ₹ ७ ते ८ कोटींपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.

७) वृक्ष करापासून सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ १ कोटी २४ लक्ष ७५ हजार व ₹ १ कोटी ४६ लक्ष ७५ हजार इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

८) पाणीपट्टीपासून सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ३९ कोटी ०१ लक्ष व ₹ ४० कोटी ९२ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

९) विशेष स्वच्छता कराव्दारे सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ७ कोटी ६२ लक्ष व ₹ ८ कोटी ६३ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

१०) प्रत्येक प्रभाग समितीमधे झोन निहाय स्वतंत्र दर निश्चित करुन तसेच झोन निहाय रस्त्यावरील विक्रीते व फेरीवाले यांच्या व्यवसायाचे क्षेत्र, ना फेरीवाला क्षेत्र निश्चित करुन लिलाव पध्दतीने बाजार फी वसुल करण्याचा प्रस्ताव आहे. या पासुन सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ २ कोटी ९७ लक्ष व ₹ ३ कोटी ४६ लक्ष इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

११) अग्निशमन करापासुन सन २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये प्रतिवर्षी ₹ १ कोटी ३४ लक्ष उत्पन्न अपेक्षित आहे.

१२) शासनाच्या मान्यतेने महानगरपालिका क्षेत्रात पारगमन / ट्रांझीट फी वसुलीचा प्रस्ताव असुन महानगरपालिका क्षेत्रातून होणारी माल वाहतूक विचारात घेता ₹ १०० कोटी इतके अतिरीक्त उत्पन्न प्राप्त होणार असून प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु झालेनंतर अतिरीक्त अर्थसंकल्पाव्दारे सदर रक्कम विकास कामासाठी उपलब्ध होऊ शकेल.

महानगरपालिकेसाठी अनेक महत्वाकांक्षी योजना अंमलात आणण्याचा मानस असून त्याची संक्षिप्त माहिती अर्थसंकल्पात अन्यत्र नमुद केली आहे. या योजना अंमलात आणण्यासाठी स्वनिधीची आवश्यकता आहे. महानगरपालिकेचा कर रुपाने जमा होणारा निधी वेळीच उपलब्ध होणे महत्वाचे आहे, सबब दृष्टीक्षेपातील योजना विचारात घेता पुढील पाच वर्षाचा मालमत्ता कर, पाणीपट्टी याबाबतच्या रकमा आगाऊ जमा करतील अशा मालमत्ता व नळ जोडणी धारकांना एकत्रित मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या १०% पर्यंत सुट देण्याचा निर्णय आहे. याबाबतची चालू मागणी विचारात घेता ५०% रक्कम जरी या योजने अंतर्गत महानगरपालिकेकडे आगाऊ जमा झाली तरी ₹ २८० कोटी इतका निधी एकरकमी प्राप्त होऊ शकतो व महानगरपालिकेस त्याप्रमाणात कमी कर्ज उभारणी करावे लागून सदर रक्कम अत्यंत सहजपणे उपलब्ध होईल. करदात्यांना १०% या नियमीत सर्वसाधारण व्याज दराच्या फायदयासह नागरी सुविधांसाठी आपल्या जिव्हाळयाच्या संस्थेत आपल्याच सोयीसाठी खारीचा वाटा उचलल्याचे मानसिक समाधान व सामाजिक सन्मान मिळेल. सदर निर्णयास अधिक - अधिक प्रसिध्दी देण्यात येणार असुन करदात्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद याद्वारे अपेक्षित आहे.

करोडो रुपयाचा उपलब्ध झालेला व होणारा विकास निधी बँकेत निरुपयोगी न ठेवता, उपलब्ध निधीचा सुयोग्य विनियोग करुन औद्योगिक वसाहत विकास, सुसज्ज वैद्याकिय आरोग्य व्यवस्था, अत्याधुनिक अग्निशमन व्यवस्था यासह सुनियोजीत, सुसंस्कृत, हरित वसईचा सर्वांगीण विकास करण्याचा संकल्प आहे. त्यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य व जिवदानी मातेचे आशिर्वाद लाभावेत हि प्रार्थना.

## ❖ ठळक खर्च बाबी ❖

१) महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक भार न पडता परिवहन सेवा अंमलात आली आहे. नजिकचे काळात संपुर्ण शहरात आवश्यक त्या सर्व मार्गीकांवर परिवहन सेवा सुरु होणार असून एतिहासीक, सांस्कृतीक वारसा लाभलेल्या आपल्या महानगरपालिकेचे दर्शन घडवणारी पर्यटकांचे आकर्षण ठरेल अशी वसई दर्शन बससेवा देखील सुरु करण्याचा मानस आहे. वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशांसाठी परिवहन सेवेअंतर्गत अधिक - अधिक सुविधा माफक दरात देण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी सन २०१३-१४ मधे परिवहन सेवा विषयक कामकाजा करीता ₹ २ कोटी ४३ लक्ष इतक्या खर्चाची तरतुद आहे.

२) इ-गव्हर्नन्स अंमलबजावणी, कार्यालयीन कामाचे आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळवणे, महानगरपालिकेची वेबसाईट तयार करणे, संगणकीय पध्दतीने अभिलेख व्यवस्थापन करणे, नगरभवन इमारतीसाठी भुसंपादनासह बांधकाम प्रशासकीय इमारत बांधकाम व नुतनीकरण, आयुक्त निवास, महापौर निवास, यासह आस्थापना खर्चासाठी सन २०१२-१३-१४ मध्ये अनुक्रमे ₹ ८८ कोटी ७४ लक्ष व ₹ १०६ कोटी ५५ लक्ष इतकी तरतूद आहे.

३) अधिकारी वर्गाकडे विविध कर्तव्ये व जबाबदाऱ्या अधिकारासह सोपवणेत आलेल्या आहेत. संस्था व कर्मचारी यामधे सौदार्हपुर्ण, विश्वासाचे व परस्पर निष्ठेचे संबंध प्रस्थापित करणेसाठी व कर्मचाऱ्यामधे भविष्यातील नोकरीच्या सुरक्षिततेची भावना निर्माण करणेसाठी शक्य त्या विभागांमधे कायम स्वरुपी पदे निर्माण करणेचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सद्यस्थितीत सर्व कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदा व इतर तत्सम कामगार कायद्याचा विचार करुन सेवा लाभ द्यावे लागत असल्याने ठेका कर्मचाऱ्यांसाठी येणाऱ्या खर्चातून कायम स्वरुपी आस्थापनेचा खर्च भागविणे कामी पुन:विनियोजन करणे शक्य होणार आहे. सद्यास्थितीत सदरचा खर्च विभागनिहाय ठेका आस्थापना शिर्षांतर्गत दर्शविण्यात आलेला आहे.

४) दिवाबत्ती व्यवस्थेसाठी साठी सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ २६ कोटी ३६ लक्ष ८५ हजार व ₹ ३१ कोटी १८ लक्ष ६० हजार इतकी तरतूद आहे.

५) कोंडवाडा व श्वान निर्बीजीकरणासाठी सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ६२ लक्ष २२ हजार व ₹ १ कोटी ७६ लक्ष ८२ हजार इतकी तरतूद आहे.

६) अग्निशमन व्यवस्थेसाठी सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ १९ कोटी १६ लक्ष ९१ हजार व ₹ २१ कोटी ६५ लक्ष १२ हजार इतकी तरतूद आहे.

७) रस्तावरील केरकचरा व इतर साफसफाई करिता सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ७३ कोटी ९६ लक्ष ५५ हजार व ₹ ८५ कोटी ७३ लक्ष ३० हजार इतका एकूण खर्च अपेक्षित आहे.

८) वसई येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयासह संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी या क्षेत्रावर अधिकभर देण्यात आला असून सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ २२ कोटी ९४ लक्ष २७ हजार व ₹ ३७ कोटी ५८ लक्ष ८५ हजार इतकी तरतूद उपलब्ध आहे.

९) आपत्कालीन व्यवस्थापन केंद्रासह इतर आपत्कालीन व्यवस्थेसाठी सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ९० लक्ष ५५ हजार व ₹ ९१ लक्ष इतकी तरतूद आहे.

१०) दहन दफनभूमीच्या एकूण व्यवस्थेसाठी सन २०१२-१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ६ कोटी ५४ लक्ष ६ हजार व ₹ २० कोटी ६३ लक्ष १७ हजार इतकी एकूण तरतूद उपलब्ध आहे.

११) उद्यान विषयक बाबींसाठी सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ५ कोटी १२ लक्ष ९८ हजार व ₹ ५ कोटी ९० लक्ष ५५ हजार इतकी तरतूद उपलब्ध आहे.

१२) मत्स्य विकास महामंडळाकडून प्राप्त अनुदानातून निर्माण होत असलेल्या मार्केटसह शहरात विविध ठिकाणी बकऱ्याचे मटन मार्केट, भाजी मार्केट, फुल मार्केट, ओले मासळी मार्केट, सुकी मासळी मार्केट इत्यादी मार्केट व बहुउद्देशिय मंडईच्या विकासासाठी सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ३ कोटी ३९ लक्ष ५ हजार व ₹ ४ कोटी २ लक्ष ६० हजार इतकी तरतूद आहे.

१३) तलाव व्यवस्थापनासाठी सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ५ कोटी २४ लक्ष ३३ हजार व ₹ ३८ कोटी २६ लक्ष २४ हजार इतकी तरतूद आहे.

१४) विविध विकासकामांसाठी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ २६६ कोटी ३१ लक्ष ११ हजार व ₹ ५६३ कोटी १९ लक्ष ११ हजार इतकी तरतूद आहे.

१५) शिक्षण व्यवस्थेसाठी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ५ कोटी ४८ लक्ष १० हजार व ₹ ५ कोटी ९० लक्ष ८० हजार इतकी तरतूद आहे. प्राथमिक व माध्यमिक शालेय शिष्यवृत्ती परिक्षा व इतर स्पर्धा परिक्षांमध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या सर्वसाधारण प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर पारितोषिके देणेकामी ₹ ५ लक्ष इतकी स्वतंत्र तरतूद आहे.

१६) ग्रंथालय व्यवस्थेसाठी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ९२ लक्ष ५५ हजार व ₹ २ कोटी ८४ लक्ष ८५ हजार इतकी तरतूद आहे. याशिवाय संस्था अनुदानांतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील ग्रंथालयांना अनुदान देण्याची स्वतंत्र तरतूद आहे.

१७) स्पर्धात्मक युगातील यशस्वीततेसाठी युवक व युवतींकरिता विशेष शैक्षणिक कार्यक्रम, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन, दहावीच्या विद्यार्थासाठी वाचनमाला उपलब्ध करणे, माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेतील विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या पहिल्या १० विद्यार्थ्यांना पारितोषीक व शिष्यवृत्ती देणे, तसेच शासनमान्य राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवरील परिक्षा व स्पर्धा परिक्षामध्ये पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य, शालेय विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप, सामुदायीक विवाह सोहळ्या अंतर्गत वर अथवा वराचे पालकांना अनुदान याकामी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ४६ लक्ष व ₹ १ कोटी इतकी तरतूद आहे. मागासवर्गीय विध्यार्थ्यासाठी व मुलींसाठी शिष्यवृत्ती व पारितोषीकाची तरतुद विद्यार्थीनींसाठी सायकल वाटप व सामुदायीक विवाह सोहळ्यातील वधुवरांचे अनुदानाचा खर्च राखीव तरतूदीअंतर्गत आहे.

१८) खेळ व संघ दत्तक घेणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर शासन मान्य स्पर्धांसाठी शालेय विद्यार्थ्यांचे क्रिडासंघ पाठवणेसाठी प्रायोजकत्व स्विकारणे, अशा स्पर्धामधील यशस्वी स्पर्धकांचा पारितोषीक देऊन सन्मान करणे तद्धतच शासन मान्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धा, ऑलिम्पीक स्पर्धा यामध्ये सहभाग घेणेसाठी निवड झालेल्या खेळाडू व संघाना अर्थसहाय्य करणे इत्यादी कामी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ १ कोटी व ₹ ४ कोटी इतकी तरतुद आहे.

नविन क्रिडागंणासाठी भूसंपादनासह स्टेडियम बांधकाम व इतर क्रिडांगण विषयक कामांसाठी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ५ कोटी १६ लक्ष व ₹ ६ कोटी ४० लक्ष इतकी तरतूद आहे.

क्रिडा विषयक कार्यक्रमांसाठी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ १० कोटी ५८ लक्ष २६ हजार व ₹ १० कोटी ९६ लक्ष ५० हजार इतकी एकूण तरतूद आहे.

१९) महानगरपालिका क्षेत्रासाठी विविध ठिकाणी रस्ते उड्डाणपूल व्यवस्थेकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे पाठपुरावा सुरु आहे. नायगाव पुल, विरार, नारिंगी, नालासोपारा, नवघर या ठिकाणी रेल्वे उड्डाणपूल व सर्विस रोड बांधकाम तसेच पूर्व पश्चिम जोडणारे पादचारी पूल यासाठी कर्ज परतफेडी व्यतिरिक्त अन्य कामे, कर्ज हप्ता, कर्ज निधीतील कामे व स्कायवॉकच्या कामासाठी अनुशंगिक खर्च यासाठी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ १० कोटी १२ लक्ष व ₹ १५ कोटी ७६ लक्ष इतकी तरतूद आहे.

२०) वृक्ष प्राधिकरणाचे विविध प्रकल्प व कामकाजासाठी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ५ कोटी ५३ लक्ष व ₹ १४ कोटी ३८ लक्ष इतकी तरतूद आहे. मत्स्यालय व भुगर्भ उद्यान बी.ओ.टी तत्वावर विकसीत करण्याचे प्रस्तावित आहे.

स्थापना : ३ जुलै २००९

२१) उपलब्ध स्कायवॉक जवळ अपंगांसाठी सरकते जिने व उव्दाहन, विविध महत्वाच्या सार्वजनिक ठिकाणी रॅम्पची व्यवस्था व इतर अपंग कल्याणकारी योजनांच्या भांडवली खर्चासह अंध, अपंग, गतीमंदांचे कल्याणासाठी कार्य करणाऱ्या बोळींज येथील अपंग पुर्नवसन केंद्रासह इतर संस्थांना अनुदान व अंध, अपंग, गतीमंद व्यक्तींना आवश्यक साहित्य पुरविणेकरीता सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ १ कोटी ८४ लक्ष ३९ हजार व ₹ ४ कोटी ३८ लक्ष ८२ हजार इतकी तरतूद आहे.

२२) पापडखिंड, पेल्हार या ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या क्षमता १० एमएलडीपर्यंत वाढविल्या असुन २० एमएलडीची उसगांव योजना पुर्णत्वास आली आहे. १०० एमएलडी ची सुर्या योजना सुरु आहे. ₹ ३५० कोटी खर्चाची १०० एमएलडी (विस्तारीत) सुर्या उद्‌भव योजना फेज २ चे काम सूरु होणार असून यासाठी प्रथम टप्प्यात महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजना अनुदान ₹ ७५ कोटी प्राप्त होणार असुन महानगरपालिका अंशदान ₹ ८० कोटीसह ₹ १५५ कोटी खर्च अपेक्षित आहे. २०० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी पुरवठा करणाऱ्या सुसरी धरणासाठी ₹ १८ कोटी इतकी रक्कम महानगरपालिकेने भरणा केली असून याव्यतिरीक्त कर्ज निधीमधून हाती घ्यावयाच्या कामांसाठी महानगरपालिका बिज भांडवलापोटी सन २०१२-१३ मधे अद्याप ₹ १ कोटी तरतूद आहे. कवडास धरणाची उंची वाढवून व गेट बांधून ७० दशलक्ष लिटर तसेच संपूर्ण जलवाहीनी खर्चासह इतर खर्च करुन उपलब्ध होऊ शकणारा १०० दशलक्ष लिटरचा वांद्री प्रकल्प राखून ठेवणेसाठी प्रयत्न सुरु आहेत. वरील प्रमाणे पाणी पुरवठा योजनांसाठी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अथवा अन्य योजने अंतर्गत महानगरपालिका हिश्याचे अंशदान, बँक /एमएमआरडीए इत्यादी वित्तीय संस्था कडून उभारण्यात येणाऱ्या अपेक्षित कर्जानुसार योजना खर्चाप्रमाणे कर्ज परतफेड यासाठी ₹ १०४ कोटी २६ लक्ष इतकी तरतुद सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात आहे. पाणी पुरवठा सेवेसाठी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ८२ कोटी २६ लक्ष ६१ हजार व ₹ २७५ कोटी ५ लक्ष ५८ हजार इतकी तरतूद आहे.

२३) सुरक्षा व्यवस्थेसाठी सुरक्षा साहित्यासाठी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ७५ लक्ष व ₹ १ कोटी ३५ लक्ष इतकी तरतूद असुन ठेका आस्थापना खर्चांतर्गत नियमीत पोलिस संरक्षणासह सुरक्षा रक्षक ठेका पध्दतीने नेमणे कामी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनक्रमे ₹ ५ कोटी व ₹ ७ कोटी ५० लक्ष इतकी तरतूद आहे.

२४) पावसाळी पाण्याचा निचरा योग्य पध्दतीने होऊन शहरामधे पाणी तुंबून राहू नये यासाठी नियमीत नाले सफाईसह पावसाळ्यापूर्वी यांत्रिक साहित्याव्दारे नाले खोदाई करणेकामी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ५ कोटी २३ लक्ष व ₹ ४ कोटी ७९ लक्ष इतकी स्वतंत्र तरतूद आहे.

२५) सॅटेलाईट सिटी योजने अंतर्गत कचरा उचलण्यासाठी अत्याधुनिक वाहने खरेदीसह पाणी पुरवठा व मलनिसा:रण, घनकचरा व्यवस्थापन, भुयारी गटार व्यवस्था, प्रस्तावित योजना सुधारणा व क्षमता वाढवणे, मलनिसा:रण केंद्रे चार प्रमुख ठिकाणी तेंरा पंप गृहांसह उभारणी करणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करुन निरुपद्रवी पाणी समुद्रात खोलवर सोडणे, पावसाळी पाणी सखल भागात भरण्याची समस्या सोडवणे इत्यादी बाबींचा या योजनेत समावेश आहे. यायोजनेमधील निकषांच्या पुर्ततेसाठी मालमत्तांचा/महानगरपालिका क्षेत्राचा भौगोलिक सर्व्हे, व्दिनोंद लेखापध्दती अंमलबजावणी, संगणकीकरण, इ-गव्हर्नस योजना इत्यादी साठी आवशक तरतुदी आहेत. सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे या योजनेसाठी अनुक्रमे ₹ ४० कोटी ८५ लक्ष व ₹ १५० कोटी ४४ लक्ष ७७ हजार इतकी तरतूद आहे.

२६) महिला बाल कल्याण योजनेसाठी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ १४ कोटी ८८ लक्ष १५ हजार ₹ १४ कोटी ४८ लक्ष ६२ हजार इतकी तरतूद आहे.

२७) पी बजेट अंतर्गत नागरी गरीब व्यक्तींसह मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ २८ कोटी २८ लक्ष ४१ हजार व ₹ ५२ कोटी १ लक्ष ४९ हजार इतकी तरतूद आहे.

२८) विशेष योजनांसाठी कर्ज निधी खात्याकडे महानगरपालिका अंशदान वर्ग करुन त्यामधून सल्लागार नेमणूकीसह इतर अनुषांगीक खर्चासाठी सन २०१२-१३ व २०१३-१४ मधे अनुक्रमे ₹ ५ कोटी २१ लक्ष ७५ व ₹ १२ कोटी ५५ लक्ष इतकी प्राथमिक तरतुद आहे. तव्दतच विशेष योजनांसाठी कर्ज परतफेड व महानगरपालिका हिश्यासाठी सन २०१३-१४ मधे ₹ २ कोटी २० लक्ष इतकी तरतुद आहे.

२९) पाणी पुरवठा, रिंगरोड व इतर योजनांसाठी ₹ १०६० कोटी इतके कर्ज अपेक्षित असून २०१३-१४ मध्ये प्रथम टप्यात ₹ १०६ कोटी कर्ज प्रत्यक्ष प्राप्तीनंतर अतिरीक्त तरतुदीव्दारे जमा खर्च दर्शवणेचे प्रस्तावित आहे. तथापी यासाठी योजना खर्चानुसार यथाप्रमाण महानगरपालिका हिस्सा व अतिरीक्त कर्ज परतफेडीसाठी खालीलप्रमाणे तरतुद आहे.

| शिर्ष | रिंगरोड प्रकल्प | पाणीपुरवठा योजना | रेल्वे उड्डाणपूल | इतर प्रकल्प |
|---|---|---|---|---|
| कर्ज परतफेड तरतुद | ₹ १२ कोटी २० लक्ष | ₹ १४ कोटी २६ लक्ष | ₹ २५ लक्ष | ₹ २० लक्ष |
| महानगरपालिकेचा खर्चातील हिस्सा | ₹ २२ कोटी | ₹ ९० कोटी | ₹ ३६ लक्ष | ₹ २ कोटी |
| एकूण | ₹ ३४ कोटी २० लक्ष | ₹ १०४ कोटी २६ लक्ष | ₹ ६१ लक्ष | ₹ २ कोटी २० लक्ष |

कर्ज निधीतून प्रस्तावित प्राथमिक दृष्टीक्षेपातील पाणीपुरवठा व इतर योजना खालीलप्रमाणे आहेत.

★ उर्वरीत भूमिगत मलनि:सारण योजना = ₹ ४६० कोटी

★ कवडास, धामणी, खडकाळी, राजीवली, सातीवली, कामण, तिल्हेर, देहरजा, वांद्री, वैतरणा इ. इतर नवीन जल स्त्रोत विकास = ₹ ३५० कोटी

★ रिंगरोडसह एकात्मिक परिवहन व दळणवळण सुविधा प्रकल्प = ₹ ८०० कोटी

★ एकात्मिक किनारपट्टी विकास व पर्यावरण संवर्धन योजना = ₹ ३५० कोटी

★ आर्थिक दुर्बल घटकांसाठी व अल्प उत्पन्न गटासाठी गृहनिर्माण योजना व पायाभूत सुविधा विकास प्रकल्प = ₹ २५० कोटी

★ एकात्मिक पर्जन्य वाहिन्या विकास प्रकल्प = ₹ ५५० कोटी

★ घनकचरा व्यवस्थापन व क्षेपण भूमीविकास प्रकल्प = ₹ ५ कोटी

★ डेस्टिनेशन वसई या उपक्रमा अंतर्गत पर्यटन विकास प्रकल्प = ₹ २०० कोटी

★ शासकीय सुधारणा व उत्पन्न वृध्दी अंमलबजावणी प्रकल्प = ₹ १०० कोटी

★ विद्युत विभागाची विविध विकास कामे, विद्युत ऊर्जा बचतीचे प्रकल्प राबवणे, कार्बनक्रेडीट मिळवणे, विद्युत व्यवस्था आराखडे तयार करणे = ₹ १ कोटी

सन २०१२-१३ च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन २०१३-१४ चे मुळ सर्वसाधारण अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक ‘अ’, महानगरपालिकेच्या ‘अ’ अंदाजपत्रकातील अंशदानासह पी बजेटचे अंदाज, जेण्डर बजेटचे अंदाज, अंध व अपंगांच्या कल्याणकारी योजनांसाठीच्या बजेटचे अंदाज, जल मल प्रवाह निधी अंदाजपत्रक ‘क’, वृक्ष निधी अंदाजपत्रक, एकत्रित पाणीपुरवठा व मल प्रवाह विनियोग कर्ज निधी अंदाजपत्रक व सॅटेलाईट सिटी योजना निधीचे अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ९५ (अ) नुसार, सन २०११- २०१२ या कालावधीत अर्थसहाय्य देऊन पुरविलेल्या सेवांबाबतचा अहवाल इतर आवश्यक सहपत्रासह सोबत सहर्ष सादर.

दिनांक:- २६/०२/२०१३

**किशोर बोर्डे**
**आयुक्त**
**वसई विरार शहर महानगरपालिका**